विश्व मराठी संमेलन - २०२५ चे आयोजन करण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: विश्वसं-२०२४/प्र.क्र.७१/भाषा-२**

नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १६ जानेवारी, २०२५

**संदर्भ** :- मराठी भाषा विभाग, शा.नि.क्र. भासस-२०१८/प्र.क्र.५०/भाषा-१, दि. १४.०३.२०२४

**प्रस्तावना : -**

मराठी भाषेचा प्रचार-प्रसार केवळ राज्यापुरता सीमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर आणि परदेशात रुंदावण्यासाठी शासनाकडून सन २०२३ व सन २०२४ मध्ये विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर संमेलनाला परदेशातील, परराज्यातील आणि राज्यातील मराठी भाषिकांकडून मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे.

मा. मंत्रिमंडळाच्या मान्यतेने विभागाच्या संदर्भाधीन दि. १४.०३.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्याचे “मराठी भाषा धोरण” जाहीर करण्यात आले आहे. या भाषा धोरणातील मुद्दा क्र. १४.९ मध्ये “मराठी भाषेचा प्रचार, प्रसार केवळ राज्यापुरता सीमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर व परदेशात रुंदावण्यासाठी प्रतिवर्षी विश्व मराठी संमेलनाचे आयोजन करण्यात येईल”, असे नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार विश्व मराठी संमेलन २०२५ चे आयोजन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

“मराठी भाषेचा प्रचार, प्रसार केवळ राज्यापुरता सीमित न राहता त्याच्या कक्षा राज्याबाहेर व परदेशात रुंदावण्यासाठी विश्व मराठी संमेलन - २०२५ चे आयोजन करण्यास पुढीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे :-

**१. विश्व मराठी संमेलन - २०२५ च्या आयोजनाचा कालावधी :-**

“विश्व मराठी संमेलन - २०२५ चे आयोजन दिनांक ३१ जानेवारी ते दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत पुणे येथे करण्यात येणार आहे.”

**२. विश्व मराठी संमेलन-२०२५ ची मध्यवर्ती संकल्पना :-**

"अभिजात मराठी" ही मध्यवर्ती संकल्पना विचारात घेऊन मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, जतन, संवर्धन यानुषंगाने विविध उपक्रमांचे/कार्यक्रमांचे आयोजन विश्व मराठी संमेलनामध्ये करण्यात येणार आहे.

**३. विश्व मराठी संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी:-**

विभागाच्या अधिनस्त असलेल्या राज्य मराठी विकास संस्था, मुंबई या संस्थेच्या स्थापनेमागे विविध क्षेत्रात मराठी भाषेचा वापर अधिकाधिक गुणवत्तापूर्ण व्हावा आणि मराठी भाषेच्या अभिवृध्दीची प्रक्रिया नियोजनपूर्वक गतिमान करावी हे मुख्य उद्दिष्ट आहे.

मराठी भाषेसंदर्भात भारतात आणि भारताबाहेर कार्य करणे हे राज्य मराठी विकास संस्थेचे मुख्य कार्य असून, राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेतील कलम क्र. ३ मधील उद्दिष्ट क्र. १३ मध्ये "अन्य राज्यातील आणि परदेशातील मराठी भाषकांसाठी विविध भाषिक उपक्रम राबविणे", या बाबीचा उल्लेख आहे. सदर बाबींचा विचार करता, **"विश्व मराठी संमेलन-२०२५" चे आयोजन करण्याची जबाबदारी राज्य मराठी विकास संस्थेवर सोपविण्यात येत आहे.** राज्य मराठी विकास संस्थेकडून सदर संमेलनाचे आयोजन करण्यासंदर्भात पुढील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत -

१) विश्व मराठी संमेलनाच्या अनुषंगाने कामांची रुपरेषा तयार करुन, नियोजन करुन विश्व मराठी संमेलनात मराठी भाषेच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम/उपक्रम राबविताना मराठी भाषेचे जतन व संवर्धन, प्रचार व प्रसिद्धी तसेच, मराठी भाषेच्या विकासाबाबतच्या मूळ धोरणाचा प्राधान्याने विचार करण्यात यावा आणि त्यानुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत राज्य मराठी विकास संस्थेने दक्षता घ्यावी.

२) सदर संमेलनाच्या आयोजनासाठी खर्च करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक ०१.१२.२०१६ व दिनांक ०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या खरेदीबाबतच्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

३) सदर संमेलनाच्या जाहिरात प्रसिद्धीविषयक कामांसाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय/आदेशान्वये विहित करण्यात आलेली कार्यपद्धती अनुसरण्यात यावी.

४) विश्व मराठी संमेलन-२०२५ मधील प्रस्तावित कामांसाठी दर/निवड करावयाच्या संस्था याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय तसेच, ई-निविदा मागविण्याबाबतच्या सर्वसाधारण निदेशांचे व अनुदेशांचे पालन राज्य मराठी विकास संस्थेने करावे.

५) विश्वसंमेलनाच्या संदर्भातील उक्त नमूद कामे करताना, राज्य मराठी विकास संस्थेच्या कोणत्याही उपक्रमासंदर्भात जी प्रचलित कार्यपध्दती राबविण्यात येते ती सर्व कार्यवाही राज्य मराठी विकास संस्थेच्या स्तरावर पूर्ण करुन विश्व मराठी संमेलन २०२५ चे आयोजन करावे.

६) विश्व मराठी संमेलन - २०२५ च्या आयोजनाची कार्यवाही पार पाडल्यानंतर सदर संमेलनाच्या फलनिष्पत्तीबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

**४. संमेलनासाठी निमंत्रित करावयाचे मान्यवर/संस्था :-**

अ) परदेशातील मराठी भाषिक संस्था - बृहन्महाराष्ट्र मंडळे, मागील वर्षी संमेलनास उपस्थित असलेले परदेशस्थ तसेच आंतराष्ट्रीय मंच समन्वयक यांच्यामार्फत विविध देशातील मराठी भाषिकांना आमंत्रण देण्यात येईल.

आ) महाराष्ट्राबाहेरील इतर राज्यातील मराठी भाषक - बृहन्महाराष्ट्र मंडळे, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्थेमार्फत विविध राज्यातील मराठी भाषिकांना/संस्थांना आमंत्रण देण्यात येईल.

इ) महाराष्ट्रातील साहित्यिक, लेखक, मराठी भाषेतील तज्ज्ञ व्यक्ती, मराठीसाठी काम करणाऱ्या व्यक्ती/संस्था - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि राज्य मराठी विकास संस्थेमार्फत आमंत्रण देण्यात येईल.

५. विश्व मराठी संमेलन २०२५ मध्ये मराठी भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या अनुषंगाने विविध उपक्रम राबविण्यासाठी रु. १० कोटी (अक्षरी रु. दहा कोटी फक्त) च्या मर्यादेत खर्च करण्यास सदर शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

विश्व मराठी संमेलन २०२५ च्या आयोजनासाठी येणारा खर्च राज्य मराठी विकास संस्थेच्या "मागणी क्र. झेडएफ-२, २२०५, कला व संस्कृती, (००) १०२ कला व संस्कृती प्रचालन, (०२) कार्यक्रम, (०२) (०१) राज्य मराठी विकास संस्था (कार्यक्रम), ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) (२२०५

३२०५)" या लेखाशीर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.२-अ/१४४३, दि.१०.०१.२०२५ आणि वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. २२/व्यय-४, दिनांक १३.०१.२०२५ अन्वये प्राप्त झालेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०११६१७४३११७७३३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NAMDEO KONDIBA BHOSALE

Digitally signed by NAMDEO KONDIBA BHOSALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MARATHI LANGUAGE DEPARTMENT, 2.5.4.20=8db1ca2341132b954db9052b5ef3bd93e7410456a96fa70df7ff81c68231fcd3, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8C6A286229ECC7982A08553F49D547EF64BE25C7F26FC96324ECE7CCCBFEB8C5, cn=NAMDEO KONDIBA BHOSALE
Date: 2025.01.17 15:20:48 +05'30'

**( डॉ. ना. कों. भोसले )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (श्री. एकनाथ शिंदे) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उपमुख्यमंत्री (श्री. अजित पवार) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. सभापती/उपसभापती/सदस्य महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. अध्यक्ष व सदस्य, मराठी भाषा समिती, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
९) मा. मंत्री, मराठी भाषा विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०) सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई
१३) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर
१५) प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
१६) प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने)
१७) लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई

१८) सह सचिव, मराठी भाषा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२२) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
२३) सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
२५) भाषा संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२६) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
२७) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२८) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२९) निवड नस्ती/भाषा-२